महाराष्ट्र शासन
सूचना का अधिकार
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवसं/गटड/वतंइलेक्ट्रिशियन/तात्पुरती ज्येष्ठता सूची/फ७/ ६०८ /२०२०, दि. १५/०३/२०२१,

प्रति,

सर्व अधिष्ठाता/अधिक्षक/अधिक्षिका/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राचार्य,

............................,

.............................

विषय : संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमधील गट-ड (वर्ग-४) संवर्गात कार्यरत इच्छुक व पात्र कर्मचाऱ्यांना वरिष्ठ तंत्रज्ञ (इलेक्ट्रिशियन) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नत्या प्रदान करण्याकरीता दि. १/१/२०२० रोजीची राज्यनिहाय तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत. . .

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अधिनस्त असलेली शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये, आरोग्य पथकांच्या आस्थापनेवरील गट-ड (वर्ग-४) संवर्गात कार्यरत असलेल्या पदोन्नतीकरीता इच्छुक व पात्र कर्मचाऱ्यांना वरिष्ठ तंत्रज्ञ (इलेक्ट्रिशियन) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती प्रदान करण्याकरीता दि. १/१/२०२० रोजीची राज्यनिहाय तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर ज्येष्ठता सूची प्रसिध्द झाल्याची बाब तात्काळ आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी व सदरील ज्येष्ठता सूचीत काही दोष/चुका/त्रुटी असल्यास त्यांची अभिवेदने मागवून ज्येष्ठता यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत संबंधित आस्थापना अधिकारी/कर्मचारी यांनी संचालनालयाच्या फ कार्यासनास हस्तपोच सादर करावेत. तद्नंतर प्राप्त अभिवेदनांचा विचार केला जाणार नाही, ही बाब संबंधित कर्मचाऱ्यांना अवगत करुन द्यावी. कर्मचाऱ्यांनी ज्येष्ठता सूचीबाबत काही आक्षेप असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह संस्थाप्रमुखांमार्फतच आक्षेप नोंदवावेत. कर्मचाऱ्यांनी संचालनालयास थेट अर्ज न पाठविण्याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात. कर्मचाऱ्यांनी अभिवेदने थेट संचालनालयास सादर केल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

उपरोक्त माहिती संचालनालयाच्या fbranchdmer@gmail.com या ईमेलवर तात्काळ सादर करण्यात यावी तसेच मूळ प्रती लवकरात लवकर संचालनालयास पाठविण्यात याव्यात. उपरोक्त तात्पुरत्या स्वरुपातील ज्येष्ठता सूचीस अंतिम स्वरुप देत असताना संस्थांकडून अचूक माहिती प्राप्त होणे अपेक्षित आहे. चुकीची वा अपुरी माहिती सादर केल्यामुळे तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त विषयास अनुसरुन कोणतीही शंका असल्यास संचालनालयाच्या फ कार्यासनातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच, सदर यादी प्रसिध्द करीत असताना कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सह संचालक (दंत),
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

| संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-४००००१. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वरिष्ठ तंत्रज्ञ (इलेक्ट्रिकल) पदाच्या पदोन्नतीकरीता विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची दिनांक ०१.०१.२०२० | | | | | | | | | | | | |
| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | संस्थेचे नाव | पदनाम | जन्म दिनांक | जात प्रवर्ग | नेमणुकीचा दिनांक | नेमणूकीचे माध्यम | एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | ज्येष्ठतेनुसार दिनांक | पात्र / अपात्र | विकल्प | शेरा |
| १ | श्री राजेश आनंदराव कसबे | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ | कनिष्ठ तंत्रज्ञ (इलेक्ट्रीकल) | | | ०४-०२-१९९९ | | | | | वरिष्ठ तंत्रज्ञ (इलेक्ट्रीकल) | शैक्षणिक आर्हतेची प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत. |